# नियमित दिवाणी दावा क्र. ३३/२०२१ मधील निशाणी ९३ वर आदेश

वादीने प्रस्तुत अर्ज दाव्यामध्ये दुरुस्ती होवून मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. वादीचे कथनानुसार त्याने प्रस्तुतचा दावा मिळकतीमधील कब्जे वहिवाटीस प्रतिवादी यांनी हरकत अडथळा करु नये, याकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. १० यांनी रस्ता/अडथळा/एस. आर./१८/२०१८ या कामी दि. २९.१०.२०२० रोजी दिलेला आदेश बेकायदेशीर स्वरुपाचा आहे व त्यामध्ये कायदयातील तरतूदींचे पालन केलेले नाही असे नमूद केलेले आहे. सदर आदेश बेकायदेशीर आहे व तो वादीवर बंधनकारक नाही असे हक्कज्ञापन होणे आवश्यक आहे. सबब, वादीने प्रस्तुत अर्जाव्दारे सदर अतिरिक्त दाद दावा कलम २१ मध्ये वाढवून मिळावी अशी विनंती केली आहे. सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपामध्ये कोणताही बदल होणार नाही असे नमूद केले आहे. सबब, सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी क्र. १ व २ तर्फे नि. ९७ ला म्हणणे दाखल करुन अर्जास तीव्र विरोध दर्शविण्यात आलेला आहे. प्रतिवादी यांचे कथनानुसार प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपामध्ये पूर्ण बदल होणार आहे. वादी यांनी दावा दाखल करतेवेळीच सदर प्रतिवादी क्र. १० यांच्या आदेशाविरोधात कथने केलेली आहेत. मात्र जाणीवपूर्वक त्या आदेशासंदर्भात हक्कज्ञापन मागितलेले नाही. यामुळे वादीचा मनाईचा अर्जदेखील नामंजूर झालेला आहे. तदनंतर वादीने दाखल केलेला प्रस्तुतचा अर्ज चालणेस पात्र नाही व तो खर्चासह नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली.

३. इतर प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जास संधी देवूनदेखील म्हणणे दाखल केलेले नाही.

४. वादी व प्रतिवादी क्र. १, २ तर्फे विधीज्ञ यांचा सविस्त युक्तीवाद मी ऐकला.

५. वादीने प्रस्तुतचा दावा हा निरंतर मनाई ताकीद मिळण्याकरीता

दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. १, २ यांनी दाव्यास कैफियत व मनाई अर्जास म्हणणे दाखल केलेले आहे. याकामी वादीने नि. ६ ला तुर्तातुर्त मनाईचा अर्ज दाखल केलेला होता. सदर अर्जावर वादी तसेच प्रतिवादी यांची सविस्तर कथने ऐकून तो अर्ज दि. ०८.१०.२०२१ रोजी नामंजूर केलेला आहे. या प्रकरणी वादीने प्रतिवादी क्र. १० तहसिलदार यांनी रस्ता प्रकरण क्र. १८/२०१८ या कामी दिलेल्या आदेशासंदर्भात मनाईची दाद मागितलेली आहे.

६. वादीतर्फे विधीज्ञ यांनी प्रतिवादी क्र. १० यांचे आदेशासंदर्भात केवळ मनाईची दाद मागून दावा विषय पूर्णतः संपणार नसलेचे नमूद केले. त्या आदेशासंदर्भात पुढील योग्य ती दाद मागणे आवश्यक असल्यामुळे तशी दाद या प्रकरणी समाविष्ट होणे गरजेचे असलेचे नमूद केले. प्रतिवादीतर्फे विधीज्ञ यांनी वादी यांना सदर दाद दावा दाखल करतेवेळीच उपलब्ध होती व ती जाणीवपूर्वक मागण्यात आलेली नाही असे नमूद केले. प्रतिवादी यांचे कथनानुसार अशा स्वरुपाची दुरुस्ती मंजूर केल्यास दाव्याच्या स्वरुपामध्ये मोठया प्रमाणात बदल होणार असून प्रतिवादी यांचे नुकसान होणार आहे.

७. वास्तविक पाहता वादी यांनी प्रस्तुत दावा हा प्रतिवादी क्र. १० यांचे सदर रस्ता प्रकरण क्र. १८/२०१८ यामधील आदेशावर नाराज होवून दाखल केलेला आहे. सदर आदेश हा मामलतदार न्यायालये अधिनियम मधील तरतूदीनुसार पारित करण्यात आलेला आहे. सदर आदेशासंदर्भात वादी यांनी दाव्यामध्ये कथने केलेली असून सदर आदेश हा वादाचा केंद्रबिंदू आहे. तरीदेखील वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा केवळ मनाई मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. तुर्तातुर्त मनाईचा अर्ज नामंजूर झाल्यानंतर सदर दुरुस्तीचा अर्ज दाखल करण्यात आलेला आहे.

८. प्रतिवादी यांची कथने पाहिल्यास दाव्याच्या स्वरुपामध्ये बदल होणार आहे असा त्यांचा आक्षेप दिसून येतो. वास्तविक पाहता सदर प्रतिवादी क्र. १० यांच्या आदेशानंतरच व त्या संदर्भातच प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. वादी यांना प्रस्तुत हक्कज्ञापनाची दाद दावा दाखल करतेवेळी उपलब्ध होती ही

बाबदेखील प्रतिवादी यांचे कथनांमधून दिसून येते. नक्कीच सदर हक्कज्ञापनाची दाद प्रकरणी समाविष्ट झाल्यास ती वादी यांच्या कथनांना अनुसरुनच असणार आहे. किंबहुना सदर प्रस्तावित दुरुस्ती दाव्यात समाविष्ट झाल्यामुळे दाव्याच्या स्वरुपामध्ये कोणताही बदल होणार नाही व त्यामुळे प्रतिवादी यांचे नुकसानदेखील होणार नाही. वास्तविक पाहता प्रस्तावित दुरुस्तीमुळे वादी व प्रतिवादी यांचेदरम्यान असलेल्या वादाचे गुणदोषावर निराकरण करण्यास मदत होणार आहे. वादी यांनी नक्कीच सदर अर्ज दाखल करण्यास विलंब केलेला आहे. मात्र केवळ विलंब झाला म्हणून वादी यांची प्रस्तावित दुरुस्ती नाकारणे योग्य होणार नाही. दिवाणी प्रक्रीया संहिता आदेश ६ नियम १७ मधील तरतूदींचा विचार करता अदयाप पुरावा सुरु व्हावयाचा आहे. यामुळे वादी यांनी एक संधी देणे मला आवश्यक वाटते. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे,

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने दाव्यामध्ये मागणी केल्यानुसार दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यात येते. दाव्यामध्ये दुरुस्ती केल्यानंतर वादीने दुरुस्त प्रती सत्वर दाखल करावयाच्या आहेत.

Digitally signed by ABHIJIT RAJSHEKHAR SOLAPURE
Date: 2021.12.03 11:42:43 +0530

इस्लामपूर (अभिजीत रा. सोलापुरे)
दिनांक– ०२.१२.२०२१ दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
इस्लामपूर